प्रेस नोट दिनांक २४/०३/२०२६

# गुन्ह्यातील जप्त मालमत्ता प्रदान केल्याबाबत.

..........................................

मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई श्री. देवेन भारती यांच्या संकल्पनेतुन आज दिनांक २४/०३/२०२६ रोजी सायंकाळी ०४:०० वा बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालया अंतर्गत परिमंडळ-६ मधील सर्व १० पोलीस ठाण्याकडुन गुन्ह्यातील चोरीस गेलेले तसेच गहाळ झालेला व पोलिसांनी हस्तगत केलेला मुद्देमाल (फिर्यादी/तक्रारदार) यांना परत करण्याकरीता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. परिमंडळ-६ मधील चेंबुर, गोवंडी, नेहरूनगर, चुनाभट्टी, ट्रॉम्बे, आर.सी.एफ. , मानखुर्द, देवनार, शिवाजीनगर, टिळकनगर पोलीस ठाण्याकडुन जबरी चोरी, घरफोडी, मोबाईल चोरी तसेच इतर चोरी व गहाळ झालेली मालमत्ता पोलीसांनी तपासादरम्यान हस्तगत केलेली एकुण रूपये २,१२,२७,०००/- ( दोन कोटी बारा लाख सत्तावीस हजार रूपये) किंमतीची मालमत्ता हस्तगत करण्यात आली होती.

त्यामध्ये ट्रॉम्बे पोलीस ठाणेचे १० ग्रॅम वजनाचे १,६०,०००/- रू. किमतीचे सोने, चुनाभट्टी पोलीस ठाणेचे अज्ञात चोराने स्नॅचिंग केलेले १२ ग्रॅम वजनाचे १,८०,०००/- किमतीचे मंगळसूत्र व २,०८,८०,०००/- रू. किमतीचे विविध कंपन्यांचे ८०० मोबाईल फोन अशी मालमत्ता आज रोजी गोवंडी येथे मा.डॉ. महेश पाटील, अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, चेंबुर मुंबई यांच्या हस्ते संबधीत फिर्यादी/तक्रारदारांना परत करण्यात आली. सदर कार्यक्रमामध्ये गुन्ह्यातील मालमत्ता पोलीसांकडुन परत मिळाल्याने फिर्यादी यांनी समाधान व्यक्त करून पोलीसांचे आभार मानले.

........